वाचले क्र. १) जाहिरात क्र. १२३५/२०२१ क्र.वायसीएमएच/७/कावि/१३८८/२०२१ दि.२९/११/२०२१
२) अधिष्ठाता व निवड समिती यांनी शिफारस केलेली निवडयादी
३)मा.आयुक्त यांचेकडील दि.१७/१२/२०२१ रोजीचा मान्य प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८
यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालय
क्र.वायसीएमएच/७/कावि/१४८५/२०२१
दिनांक- १८/१२/२०२१

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका स्थापना १९८२ यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालय

विषय- यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयाकरीता एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात वरिष्ठ निवासी, कनिष्ठ निवासी, वैद्यकिय अधिकारी सी.एम.ओ, शिफ्ट ड्युटी व बी.टी.ओ पदांवर नियुक्ती आदेश देणेबाबत...

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयामध्ये रूग्णांचा वाढता व्याप विचारात घेता आवश्यक असलेले वरिष्ठ निवासी, कनिष्ठ निवासी, वैद्यकिय अधिकारी शिफ्ट ड्युटी, सी.एम.ओ व बी.टी.ओ पदे एकत्रित मानधनावर ६ महिने करीता मानधनावर भरणेकामी उपरोक्त वाचले क्र.१ अन्वये दैनिक वृत्तपत्रात व मनपा संकेतस्थळावर जाहिरात प्रकटन प्रसिध्द करणेत आले असता अर्ज स्विकृती दिनांक ०१/१२/२०२१ ते दि.०७/१२/२०२१ अखेर उपस्थीत वरिष्ठ निवासी, कनिष्ठ निवासी, वैद्यकिय अधिकारी शिफ्ट ड्युटी, सी.एम.ओ व बी.टी.ओ पदांकरीता उपलब्ध सर्व अर्जांची छाननी करून त्यामधून पात्र उमेदवारांपैकी कनिष्ठ निवासी दंतरोग विभाग वगळता इतर पदांचे उमेदवारांची उपरोक्त वाचले क्र.२ अन्वये गुणानुक्रमे व आरक्षणानुसार निवडयादी तयार करणेत आलेली असून त्यामधून निवड झालेल्या वरिष्ठ निवासी-३४, कनिष्ठ निवासी-५७, वैद्यकिय अधिकारी शिफ्ट ड्युटी-८, सी.एम.ओ-५ व बी.टी.ओ-२ अशा उपबल्ध १०६ उमेदवारांचा व रिक्त पदांचा विचार करून वैद्यकिय सेवा ही तातडीची बाब असल्याने निवड केलेल्या विविध पदावरील एकूण-१०६ डॉक्टर उमेदवारांना तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर सहा महिनेकीरता प्रथम नियुक्ती आदेश निर्गत करून त्यास मा.स्थायी समिती सभेची कार्योत्तर मान्यता घेण्यात येईल.

सबब, मी आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी-१८ या आदेशान्वये मा. अधिष्ठाता पदव्युत्तर संस्था यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय यांनी उपस्थीत उमेदवारांची गुणानुक्रमे व आरक्षणानुसार निवड करून सोबत जोडलेल्या निवड यादी/प्रपत्र अ मधील वरिष्ठ निवासी-३४,कनिष्ठ निवासी-५७, वैद्यकिय अधिकारी शिफ्ट ड्युटी-८, सी.एम.ओ-५ व बी.टी.ओ-२ असे एकूण-१०६ उमेदवारांची नियुक्ती करणेकामी शिफारस केलेली आहे. रूग्णालयास तातडीने विविध प्रकारचे डॉक्टर पदांची आवश्यकता असल्याने व मागील उमेदवारांचा सहा महिन्याचा नियुक्त कालावधी संपुष्टात आलेला असल्याने नव्याने निवड झालेल्या वरिष्ठ निवासी-३४, कनिष्ठ निवासी-५७, वैद्यकिय अधिकारी शिफ्ट ड्युटी-८, सी.एम.ओ-५ व बी.टी.ओ-२ असे एकूण-१०६ उमेदवारांना आदेशाच्या दिनांक-१८/१२/२०२१ ते दि. १७/०६/२०२२ अखेर १८० दिवस कालावधीसाठी खालील अटी शर्तीस अधिन राहून तात्पुरत्या स्वरूपात नेमणुक देणेस मंजुरी देत आहे. सोबतचे प्रपत्र अ मध्ये नमुद व नियुक्त केलेल्या वरिष्ठ निवासी- ३४, कनिष्ठ निवासी-५७, वैद्यकिय अधिकारी शिफ्ट ड्युटी-८, सी.एम.ओ-५ व बी.टी.ओ-२ अशा एकूण-१०६ डॉक्टर उमेदवारांना देण्यात येणारे एकत्रित मानधन त्यांच्या नावापुढे दर्शविणेत आलेले आहे.

अटी शर्ती-

१) वरिष्ठ निवासी व कनिष्ठ निवासी पदे ही निवासी स्वरूपाचे असल्याने संबंधित वरिष्ठ निवासी व कनिष्ठ निवासी यांना रूग्णालयामध्येच २४ तास वास्तव्य करावे लागेल.जे वरिष्ठ निवासी व कनिष्ठ निवासी डॉक्टर रुग्णालयात वास्तव्य करत नाही असे निर्देशनात आलेस त्यांची सेवा त्वरीत समाप्त करणेत येईल.
२) वरिष्ठ निवासी, कनिष्ठ निवासी, वैद्यकिय अधिकारी सी.एम.ओ, शिफ्ट ड्युटी, आय.सी.यु व बी.टी.ओ यांनी अपवादात्मक परिस्थेतीत रूग्णालय सोडावयाचे असल्यास रूग्णालय प्रमुख यांची पुर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.